## ऋ ण नि र्दे श

कोणत्याही कार्यपूर्तीसाठी अनेकांचे सहकार्य, मार्गदर्शन आणि प्रेरणा यांची आवश्यकता असते. या गोष्टी प्राप्त होण्याचे भाग्य मला लाभले आणि लघुप्रबंधलेखनाच्या कार्यपूर्तीचा आनंद मी घेऊ शकले. तेव्हा कार्य संपन्न झाल्यानंतर या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे अगत्याचे वाटते.

प्रथमतः मला बुद्धी, प्रेरणा देणा-या परमेश्वराचे, आदरणीय गुरूजनांचे आणि आई, वडिल, पती यांचे स्मरण करून मी त्यांना वंदन करते.

आजपर्यंत मनुस्मृतीवर विचारवंतांनी लेखन केले आहे. मनुस्मृती खालोखाल किंबहुना बरोबरीचा असलेला असा "याज्ञवल्क्यस्मृती हा धर्मग्रंथ दुर्लक्षित राहिला आहे. तेव्हा स्मृतीग्रंथातील स्त्री-विषयक विचारांची चिकित्सा करण्याच्या उद्देशाने मी लघुप्रबंधलेखनाचा विषय निश्चित केला.

लघुशोधनिबंधाचा विषय निवडीपासून ते तो सादर करेपर्यंत मला ज्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले त्या आदरणीय डॉ.श्रीमती सुहासिनी राजेभोसले यांचे मी हार्दिक आभार मानते. माझ्या ठिकाणी संस्कृत भाषेच्या प्रेमाचे बीज लावणा-या, गुरूश्रेष्ठ डॉ.आ.ह.साळुंखे यांनी केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचेही मनःपूर्वक आभार मानते. डॉ.बी.एस्.खराडे यांचेही याकामी मला सहकार्य लाभले, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

भांडारकर, प्राच्य विद्या संशोधन पुणे येथील ग्रंथपाल डॉ.श्री.वा.ल.मंजुळ, धर्मकोश, वाई येथील सौ.नानस्कर यांनी पुस्तके उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

ज्या छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे मी काम करते, तेथील मा.प्राचार्य आर.डी.गायकवाड यांनी दिलेले प्रोत्साहन व वेळोवेळी केलेले सहकार्य याबद्दल मी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करते. लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा येथील प्राचार्य श्री.अमरसिंह राणे यांनी एम्.फिल्.संस्कृतचे केंद्र चालू ठेवले त्यामुळे हे काम करणे सोयीचे झाले, त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानते.

मौलिक सूचनांबद्दल आणि वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आमचे विभागप्रमुख प्रा·श्री·के·जी·कुंभार सर, त्यांची मी आभारी आहे·

एम्·फिल्·प्रवेश परीक्षेपासून ते लघुप्रबंध सादर करेपर्यंत मदतीचा हात देणा-या माझ्या सहकारी प्रा·सौ·उर्मिला अराणके आणि इतर सहकारी प्राध्यापिकांनी दिलेल्या प्रेरणेबद्दल मी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करते·

डॉ·अरुण धुमाळे, कोल्हापूर व डॉ·अरुंधती मोटे, सातारा यांनी सपिंड विवाहाचे परिणाम जाणून घेण्यास मौलिक सहकार्य केले त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे·

टंकलेखन, झेरॉक्स इ·कामे वेळेत आणि चांगल्याप्रकारे पूर्ण करून दिल्याबद्दल श्री·मुकुंद ढवळे यांना धन्यवाद ।

हे काम माझ्याकडून पूर्ण झाले याचे खरे श्रेय माझे आई-वडील सौ·सिंधू चव्हाण व श्री·शरदराव चव्हाण यांना तसेच पती श्री·चंद्रकांत मोटे यांनाच द्यावे लागेल· कारण त्यांच्या प्रेरणेने, सहकार्याने मी हे काम पूर्ण करु शकले· माहेरच्या आप्तेष्टांनी केलेल्या सहकार्याबद्दल, लहान असूनही दाखविलेल्या समंजसपणाबद्दल चि·अनिकेत, या सर्वांविषयी सदैव कृतज्ञ राहणेच योग्य ठरेल·

याशिवाय ज्यांनी ज्यांनी या कामी मला प्रोत्साहन दिले, मदत केली त्या सर्वांचे मी आभार मानते·

सातारा

दिनांक : डिसेंबर, 1993 प्रा·सौ·पौर्णिमा मोटे·

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR